# NATIONAL CADET CORPS

SESSION : 2022 - 2023



**Lt. K.R. Padghan**
NCC Officer



**Govind Suradkar**
Senior Under Officer



**Nikita Dukare**
Junior Under Officer



**Manoj Ade**
Junior Under Officer



**Kailas Bhambale**
Junior Under Officer



**Neha Borde**
Junior Under Officer



**SGT. Kisan Ghube**
RDC / IBC - PUNE



**SGT. Prajwal Suradkar**
BLC - Amravati



**CDT. Vaishanavi Sapkal**
BLC - Amravati



**CDT. Neha Dukare**
BLC - Amravati



**CDT. Karan Pendharkar**
TSC / IGC - Amravati



**SGT. Shantanu Kalyankar**
BLC - Amravati



**CGT Puja Mukhmule**
CDT- State Level Runner

# BEST ACHIEVEMENT OF THIS SESSION

**13 Cadets selected in Indian Army.**



# Photo Gallery of the programme

## Anti-Tobacco Day 31st May 2022




## Shiv Rajyabhishek programme 6th Jun 2022



# Environment Day 6th Jun 2022




# International Yoga Day 21st Jun,2022



# Tree plantation 2nd July 2022




# Kargil Vijay Diwas 26th July2023



# Azadika Amarut Mohatsav 8th to 17th Aug2022



Martyr Kailas Pawar Memorial Day 30th July 2022




# Teacher's day 5thSep,2022



# Annual Training Camp 2022-23




# NCC New Enrollment 28th Sep2022



Inauguration of construction the new building of NCC department 20th Oct2022



National Unity Day 31st Oct2022



## NCC Day Celebration 27th Nov 2022



## Constitution day Celebration 26th Nov 2022



# Punit Sagar Sankalp on2nd Dec,2022




# Agniveer Felicitation programme 23rd Dec 2022



# Cleanliness Drive 24th Dec,2022




# Blood Donation Camp 12thJan 2023



## Army Day Celebration 16th Jan2023



## Kranti Din 23rd Jan2023



# National Girls Day 24thJan2023




# Republic Day Celebration 26thJan2023





# News Cutting

## Anti-Tobacco Day 31st May 2022

**वृत्त नायक** — बुधवार, दि. ०१ जुन २०२२

### राष्ट्रीय छात्र सेवेद्वारे जागतिक तंबाखू मुक्त दिवस साजरा



चिखली : स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात दि. ३१ मे रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख व १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथिल कमांडिंग ऑफिसर कर्नल डी. एस. क्षेत्री व रिसाल्दार मेजर धर्मेंदरसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक तंबाखू मुक्त दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य हे अध्यक्षस्थानी होते तर राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा शाल्यचिकित्सक कार्यालय बुलढाणा यांच्याकडून देण्यात आलेल्या फलकाचे अनावरण करून त्यावर दिलेल्या नऊ नियमांचे कॅडेट कडून वाचन करून घेतले. व तंबाखू मुळे होणारे दुष्परिणाम व कॅन्सर सारख्या भयंकर आजाराचे मुख्य कारण समजून सांगण्यात आले.

तंबाखू खाणे हे देखील एक प्रकारचे व्यसनच आहे व आपण या पासून दूर असले पाहिजे त्याबद्दल त्यांना जाणीव करून देण्यात आली. या या कार्यक्रमाचे प्रस्ताविक एनसीसी अधिकारी लेफ्टनंट किरण पडधान यांनी केले तर अध्यक्षीय भाषणाने प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना गुटखा, तंबाखू, पानमसाला अशा व्यसनापासून आपण दूर राहिले पाहिजे असे सांगितले. जेव्हा आपण सार्वजनिक ठिकाणी जात असतो तेव्हा आपण त्याच्या कोपऱ्यात तसेच महाविद्यालयातील काही कोपऱ्यात जिने खाली तंबाखू किंवा गुटख्याची थुंकी पडलेली दिसणे व त्याचे डाग त्या भिंतीवर ज्या प्रमाणे अत्यंत वाईट व घाणेरडे दिसतात तर त्याचा आपल्या शरीरावर किती भयंकर परिणाम होतो त्याबद्दल कॅडेटला जाणीव करून दिली. त्यानंतर कॅडेट ना मी तंबाखू खाणार नाही व किमान माझ्या दोन मित्रांना जर हे व्यसन असेल तर त्यांना त्यामधून बाहेर काढण्याचा प्रयत्न करेल अशी शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी एनसीसी गिताने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी सर्व कॅडेटने परिश्रम घेतले.

---

## Shiv Rajyabhishek programmed 6th Jun 2022

03 ■ मंगळवार दि. ७ जुन २०२२ ■ सायं दैनिक **झुंजार दस्तक**

### श्री शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेद्वारे शिवराज्याभिषेक दिन साजरा




चिखली (प्रति): स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात दि. ६/६/२०२२ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख व महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली शिवराज्यभिषेक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील परमणूशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शालिनी काटोले ह्या अध्यक्षस्थानी होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लेफ्ट. किरण पडधान यांनी केले तर अध्यक्षीय भाषणात काटोले मॅडम यांनी राज्यभिषेकामागील पार्श्वभूमीवर प्रकाश टाकीत पाहिले छत्रपती व अष्टप्रधान मंडळ व त्याची कामे कीती महत्त्वाचे आहेत त्याबद्दल त्यांनी माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन कोकोडे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन राजू करपे यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक वृंद, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथालय सहाय्यक, व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्र गीत व राष्ट्रगीताने करण्यात आली.

# Environment Day 6th Jun 2022

सुविधा

दैनिक किसान सभा

## श्री.शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेवेद्वारे जागतिक पर्यावरण दिवस साजरा

**चिखली/प्रतिनीधी:** स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात दिनांक ६ जून २०२२ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख व १३महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथिल कमांडिंग ऑफिसर कर्नल डी.एस.छेत्री व रिसाल्दार मेजर धर्मेंदरसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पर्यावरण दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील परमाणूशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शालिनी काटोले ह्या अध्यक्षस्थानी होत्या. बॉटनिकल गार्डनमध्ये सफाई करून महाविद्यालयातील सर्व झाडांची सफाई करून पाणी देण्यात आले. काटोले मॅडम यांनी प्रत्येक कॅडेटनी एक झाड वाढविण्यासाठी आव्हान



केले.तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे कीती महत्त्वाचे आहेत त्याबद्दल त्यांना जाणीव करून देण्यात आली.तसेच महाविद्यालयात आठवड्यातुन किमानएक तास श्रमदान करून झाडाची सफाई करून पाणी दिले पाहिजे. हा महाविद्यालयाचा परिसर जेव्हढा सुंदर आहे त्याहुन अधिक सुंदर राहण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक एनसीसी अधिकारी लेफ्टनंट किरण पठाण यांनी केले तर अध्यक्षीय भाषणात यासाठी प्रयत्न करेल अशी शपथ घेण्यात आली.व शेवटी एनसीसी गिताने कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅडेट गोविंद सुरडकर तर आभार प्रदर्शन निकिता डुकरे यांनी केले तसेच या कार्यक्रमासाठी सर्व एनसीसी कॅडेटनी परिश्रम घेतले.

# International Yoga Day 21st Jun,2022

सुविधा

दैनिक किसान सभा

## श्री शिवाजी महाविद्यालयात जागतिक योगा दिन उत्साहात साजरा

**चिखली/प्रतिनीधी:** स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संकल्पनेतून व विद्यापीठ अनुदान आयोगाचे सूचनेनुसार व १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल डी.एस.छत्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे एनसीसी युनिट, श्री. शिवाजी हायस्कूल एनसीसी युनिट, एसपीएम कॉलेज एनसीसी युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील खुले रंगमंच या ठिकाणी योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या योग दिनाचे घोषवाक्य हे मानवतेसाठी योग हे आहे. योग शास्त्र हे एक प्राचीन शास्त्र आहे.संयुक्त राष्ट्र संघटनेने २१ जून हा योग दिन म्हणून



मान्यता दिली व भारताच्या नेतृत्वाखाली १७५ देशांच्या प्रतिनिधीकडून मान्यता दिली. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २१ जून २०१६ पासून योग दिनाला सुरुवात झाली. आजच्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख हे होते तर योगाचार्य श्री पी.एम.चौधे व १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे हवालदार रेशम थापा हे प्रमुख पाहुणे होते. तसेच महाविद्यालयातील सर्व कर्मचारी बंधू /भगिनी व महाविद्यालयातील एनसीसी, एनएसएस व शारीरिक शिक्षण विभाग श्री शिवाजी हायस्कूल एनसीसी युनिट व एसपीएम महाविद्यालयातील एनसीसी युनिट यांना योगाचे धडे देऊन राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.एम.चौधे यांनी केले. डॉ. ओमराज देशमुख यांनी विद्यार्थ्यांना योगा बद्दल व त्याच्या फायदे याबद्दल मार्गदर्शन

**(उर्वरीत पान नं.२ वर...)**

# Tree plantation 2nd July 2022

सायं दैनिक झुंजार दस्तक ■ सोमवार दि. ४ जुलै २०२२ ■ 02

## श्री शिवाजी महाविद्यालयात एनसीसी युनिटद्वारे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न




चिखली (प्रति): स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली येथील एनसीसी युनिटद्वारे २ जुलै रोजी १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडीग ऑफिसर कर्नल डी.एस. छेत्री व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या वसतिगृहाच्या बाजूला वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बापू इंगोले हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते त्यांच्या हस्ते वटवृक्षाच्या झाडाचे वृक्षारोपन केले. तसेच संस्थेचे नियुक्त सदस्य डॉ. पी.एस.वायाळ, संगाबाअवि अमरावतीचे व्यवस्थापन समिती सदस्य डॉ.निलेश गावंडे, संस्थेचे सन्माननिय आजीवन सदस्य बाबासाहेब भोंडे, मधुकररावजी पाटील, विष्णुभाऊ पाटील, पुंडकर काका, शाळा निरीक्षक माळोदे सर या मान्यवरांच्या हस्ते वड, पिंपळ, शेवगा, रेनट्री, बेहडा, ऑक्सिजन पाम अशा पन्नास झाडांची लागवड करण्यात आली. यावेळी डॉ. निलेश गावंडेनी कॅडेटला मार्गदर्शन करतांना त्यांच्या विद्यार्थी दशेत त्यांनी शिवाजी विद्यालयातील डोलदार अशोकाच्या झाडांची त्यांनी रोपण, जतन, संगोपन केलेले आहे. याबद्दल आठवण करून किमान तुम्ही यातील अर्धे झाडं जगविली तरी तुमची मेहनत सार्थ ठरेल. दिलिप बापूनी आजच्या या वाढत्या तपमानात व पावसाच्या लहरी पणात झाडी किती आवश्यक गोष्ट आहे हे सांगितले. डॉ.पी.एस.वायाळ यांनी कोरोना काळात ऑक्सिजन हि आवश्यक गोष्टीबद्दल सांगितले व दरवर्षी आपण दोन वृक्ष जरी जगत केले तरी खूप फायदा होईल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आयोजन लेफ्ट. किरण पडघान यांनी केले, सिनिअर अंडर ऑफीसर गोविंद सुरडकर यांनी सर्व मान्यवरांनी आमच्या विनंतीला मान देऊन आजच्या दिवशी वृक्षारोपण करून कॅडेटचा उत्साह वाढविला त्यासाठी आभार व्यक्त केले, ज्युनिअर अंडर ऑफिसर निकिता डुकरे, व सर्व एनसीसी कॅडेटनी तसेच महाविद्यालयातील डॉ. राजू गवई, डॉ.जे.जे.जाधव, डॉ.बोबडे व सर्व वरीष्ठ व कनिष्ठ महा.शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# Kargil Vijay Diwas 26th July2023

वृत्त नायक हिंदी / मराठी बुधवार, दि. २७ जुलै २०२२

## एनसीसी युनिटद्वारे कारगिल दिवस उत्साहात साजरा




**चिखली :** स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात दि.२६ जुलै २०२२ रोजी १३ महाराष्ट्र बटालियन खामगांव येथिल कमांडींग ऑफिसर कर्नल डी. एस.छत्री व महावियालयाचे प्राचार्य याच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी युनिट द्वारे कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डी.आर. उन्हाळे हे होते तरप्रमुख वक्ते राम पवार हे होते. लेफ्ट.किरण पडघान यांनी पिपीटी द्वारे सर्व ठिकाणे दाखवून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.राम पवार यांनी शहीद झालेल्या कॅप्टन भत्रा व इतर शहीद जवानाबद्दल माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात उन्हाळे यांनी अग्निपथ बद्दल सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिनिअर अंडर ऑफिसर गोविंद सुरडकर यांनी तर आभारप्रदर्शन ज्युनिअर अंडर ऑफिसर निकीता डुकरे यांनी केले. तत्रसहाय्य ज्युनिअर अंडर ऑफिसर कैलास भांबळे, या कार्यक्रमासाठी प्रियांका चव्हाण, पुनम वैद्य, पवन बनसोडे, सागर जाधव हया कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व सर्व एनसीसी कॅडेट यांनी परिश्रम घेतले.

# Azadika Amarut Mohatsav 8th to 17th Aug2022

आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

परतवाडा टाईम्स

संपादक:-नरेश तायवाडे

RNI NO. - MAHBIL/2018/80744

दि. 14-08-2022

## श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्याल चिखली येथे भारतीय स्वातंर्याचा अमृतमहोत्सव सप्ताह उत्साहात सुरू

चिखली | मयूर मोरे

स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली येथे भारताच्या 75 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये दिनांक 9 ऑगस्ट क्रांती दिना निमित्त शहीद सन्मान सदभावना रॅली काढण्यात आली.

श्री.शिवाजी महाविद्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पादरम्यान विद्यार्थ्यांची रॅली काढून शहिदांना श्रद्धांजली देण्याचे काम करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून रॅली पुढे तालुका क्रिडा संकुल येथे सामुहिक राष्ट्रगीत गाण्यासाठी एकत्रित जमले.दिनांक 10 ऑगस्ट रोजी महाविद्यालयामध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



दिनांक 11 ऑगस्ट रोजी महाविद्यालय मध्ये इको-फ्रेंडली राखी मेकिंग स्पर्धा पार पडली .त्यामध्ये पर्यावरण पूरक राखी कोणतेही कृत्रिम साहित्य न वापरता फुले पाने वेली यांच्यापासून राखी विद्यार्थ्यांनी बनवल्या व विविध झाडांना राखी बांधण्यात आल्या.

दि.12 ऑगस्ट रोजी महाविद्यालयामध्ये स्वातंत्र्य महोत्सवानिमित्त पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी अनेक पोस्टर्स बनवून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यामध्ये प्रामुख्याने भारताची विविधता दर्शवणारा चित्राने सर्वांचे मन आकर्षून घेतले.दि.13 ऑगस्ट रोजी महाविद्यालयामध्ये वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.त्यामध्ये महाविद्यालयातील वीस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तसेच सकाळी महाविद्यालयामध्ये ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. स्वातंत्र्य महोत्सवाच्या अमृत वर्षानिमित्त महाविद्यालयामध्ये 14 ऑगस्ट रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर विभाजन विभिषीका स्मृति दिनानिमित्त प्रा.डॉ.जे.जे.जाधव सर यांनी हिंदुस्तानच्या फाळणीनंतर उद्भवलेल्या विस्थापित नागरिकांच्या समस्या विषयी सविस्तर माहिती दिली त्याच बरोबर त्यांना आदरांजली वाहिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख, एनसीसी अधिकारी लेफ्टनंट किरण पडघान, एन.एस.एस.प्रमुख एस.एम.काळे व विद्यालयातील इतर प्राध्यापक आणि कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# Teacher's day 5thSep,2022

## शिवाजी कला विज्ञान महाविद्यालय 'शिक्षक दिन' शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये समन्वय असावा -पडघान सर

बुलढाणा – संजय निकाळजे – शिक्षक हा भावी पिढीचा शिल्पकार असून त्यांच्याकडून आपल्याला ज्ञान मिळते.जगाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी मिळत असते.आपल्या गुरु शिक्षकाविषयी कृतज्ञता व्यक्त करून शिक्षकाप्रती असलेले प्रेम व आदर ठेवावा, त्याचप्रमाणे शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये समन्वय ठेवून एकमेकांनी एकमेकास मानसन्मान प्रदान करावा, असे प्रतिपादन चिखली येथील शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.पडघानसर यांनी व्यक्त केले.

सोमवार ५ सप्टेंबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्ताने व शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सत्कार आयोजित केला होता, याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी पडघानसर यांच्यासह मावळेसर, उन्हाळेसर, पवारसर, बनसोडेसर, शशिकांत पाटीलसर, राम पवारसर, सागर जाधवसर, गेडामसर, तसेच



प्रतिभा चिखले मॅडम, प्रियंका चव्हाण मॅडम यांचा सत्कार १२ वि विज्ञानचे विद्यार्थी हर्षल निकाळजे, कु. भूशरा शेख, कु खेहल भराड, कु रेणुका कारवा, कु श्रुती यंगड, कु खेहल गवई ,विवेक बोर्डे, रोहन इंगळे यांच्यासह विद्यार्थ्यांनी केला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शिक्षकांना फोटो प्रतिमा भेट दिली.यावेळी गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा या ओळींचा अर्थ अभिषेक छरे या विद्यार्थ्याने व्यतीत केला.कार्यक्रमाला प्रीतम डोंगरदिवे, निखिल असोलकर, आनंद जाधव, रोहित सोनारे, आदित्य गुंड, सोहम जाधव, संदेश जाधव, समर्थ लाकडे, अविनाश सुरसे, अल्फराज पठाण, सोहेल पठाण, विकी देवकुळे ,अजय इंगळे कु नंदिनी अवसरमोल कु रेणुका पट्टे, कु हर्षदा जाधव कु निकिता सोळंके, कु खेहल भराड यांच्यासह ११ व १२ वि विज्ञानचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन कु.रेणुका कारवा व कु श्रुती यंगड यांनी केले कु. खेहल गवई हिने आभार मानले.

# NCC New Enrollment 28th Sep2022

## श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना भरती उत्साहात संपन्न



**मेहकर टाईम्स**
**मयूर मोरे**
**खास - बातमी**

चिखली : चिखली, श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली येथे राष्ट्रीय छात्र सेना भरती प्रक्रिया दि. 28 ऑक्टोबर रोजी पाडली.खामगाव येथील 13 महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल अमित भटनागर, आर.एम. धर्मेंद्र सिंग, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लेफ्ट.किरण पडघान,हवालदार किशोर,हवालदार मिकिम थापा , हवालदार गोपाल थापा,हवालदार सुशील थापा यांनी प्रथम विद्यार्थ्यांची शारीरिक चाचणी पार पडली,त्यानंतर वैद्यकिय चाचणी पार पडली,लेखी परीक्षा घेऊन त्यानंतर 49 विद्यार्थी व 16 विद्यार्थिनींनी प्रवेश देऊन एकूण 65 विद्यार्थ्यांना भरती करून घेण्यात आले. याप्रसंगी 13 महाराष्ट्र बटालियन खामगावचे पी आय स्टाफ हजर होते.

# Inauguration of construction the new building of NCC department 20th Oct2022

आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

**परतवाडा टाईम्स**

SOCIAL MEDIA EDITION

संपादक:-नरेश तायवाडे

RNI NO. - MAHBIL/2018/80744

दि. 21-10-2022

## श्री.शिवाजी महाविद्यालयात एनसीसी युनिटच्या नवीन वास्तूबांधकामाचे उद्घाटन संपन्न



चिखली । मयूर मोरे

स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात दि.२० ऑक्टोबर रोजी एनसीसी युनिटच्या नवीन वास्तु बांधकामाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ओमराज देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य श्री. मधुकररावजी पाटील, श्री. विष्णुभाऊ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमासाठी संस्थेचे स्वीकृत सदस्य डॉ.पी.एस. वायाळ, श्री.शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकिशोर गायकवाड, आयक्यूएसी समन्वयक डॉ. वनिता पोच्छी, शारीरिक संचालक सचिन कोकोडे, इंजिनियर गुणवंतराव देशमुख यांच्या हस्ते टिकाव मारून उद्घाटन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लेफ्ट.किरण पडघान यांनी केले. आपल्या महाविद्यालयाचे एनसीसी युनिट हे एक नंबरवर असून त्याची वास्तु ही चांगली असली पाहिजे त्यासाठी प्राचार्य व सर्व आजीवन सदस्य यांनी संस्थेचे अध्यक्ष मा.हर्षवर्धन देशमुख यांच्याकडे मागणी करून त्याचा पाठपुराव्यानंतर संस्थेने या वास्तु बांधकामासाठी निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे महाविद्यालयात हि भव्य वास्तु उभी राहणार आहे.या कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्यास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व एनसीसी युनिटने प्रयत्न केले.

# National Unity Day 31st Oct2022

आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !
परतवाडा टाईम्स
SOCIAL MEDIA EDITION
संपादक:-नरेश तायवाडे
RNI NO. - MAHBIL/2018/80744
paratwadatimes
paratwadatimes@gmail.com
दि. 31-10-2022

## श्री.शिवाजी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटद्वारे राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा



चिखली। मयूर मोरे

स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटद्वारे दि.31 ऑक्टोबर रोजी 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगांव येथिल कमांडिंग ऑफिसर कर्नल अमित भट्नागर रिसालदार मेजर धर्मेंद्रसिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. 2014 साली जेव्हा नरेंद्रजी मोदी पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी 31 ऑक्टोबर हा दिवस सरदार वल्लभ भाई पटेल यांनी सर्व संस्थाने विलीन करून जी एकता स्थापन केली त्या एकतेचे प्रतीक म्हणून हा दिवस साजरा केला जातो.तसेच दिवंगत पंतप्रधान इंदिराजी गांधी यांना देखील विनम्र आदरांजली वाहिली.या कार्यक्रमात कॅडेटला अखंड एकतेची शपथ देण्यात आली.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एनसीसी अधिकारी लेफ्ट.किरण पडधान, सिनिअर अंडर ऑफिसर गोविंद सुरडकर,ज्युनिअर अंडर ऑफिसर निकिता ठुकरे, कैलास भावळे,सर्व कॅडेट शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# NCC Day Celebration 27th Nov 2022

वृत्त नायक
बुधवार, ३० नोव्हेंबर २०२२

## श्री शिवाजी महाविद्यालयात एनसीसी दिन साजरा



चिखली : स्थानिक श्री शिवाजी महाविद्यालय चिखली येथे २७ नोव्हेंबर वार रविवारला एनसीसी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संपूर्ण देशात एनसीसी द्वारे विविध उपक्रमाअंतर्गत नोव्हेंबर महिन्याच्या चौथ्या रविवारला एनसीसी दिवस साजरा केला जातो. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख व १३ महाराष्ट्र बटालियन खामगांव येथिल कॅमांडींग ऑफिसर कर्नल अनिल भटनागर, रीसालदार मेजर धर्मेंदरसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या मुक्त विद्यापीठ केंद्राचे समन्वयक डॉ.गणेश मालटे अध्यक्ष म्हणून तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून लेफ्ट. डी. आर. सावळे हे होते. या कार्यक्रमात सर्व एनसीसी कॅडेट्सना त्यांच्या वर्षभरातील उपक्रमांसाठी त्याचा उत्साह वाढविण्यासाठी वर्षभर झालेल्या विविध स्पर्धा व उपक्रमाबद्दल त्यांना मेडल देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात लेफ्टनंट डी.आर. सावळे ह्यांनी कॅडेटला अग्निविर, सामाजिक जबाबदारी याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. गणेश मालटे यांनी आपण ज्याप्रमाणे एनसीसी मध्ये परिश्रम घेत आहात त्याबद्दल आनंद व अभिमान आहे. परंतू तसेच परिश्रम रेगुलार अभ्यासक्रमात घेतले पाहिजे. ज्याप्रमाणे इकडे मेडल मिळविलं त्याप्रमाणेच तिकडेही मिळविली पाहिजेत. मुलींनी आपली आसाम रायफलमध्ये भरती झालेल्या बुलडाणा जिल्ह्यातील पहिली महिला कॅडेट राखी साळवे यांच्याप्रमाणे तयारी करून पोलीस भर्ती प्रक्रिया यशस्वी केली पाहिजे. या कार्यक्रमासाठी एनसीसी अधिकारी लेफ्ट. किरण पडधान, सिनिअर अंडर ऑफिसर गोविंद सुरडकर, ज्युनिअर अंडर ऑफिसर कैलास भाबळे व सर्व एनसीसी कॅडेट यांनी परिश्रम घेतले.

एनसीसी अधिकारी लेफ्टनंट किरण पडधान यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंडर ऑफिसर निकिता ठुकरे व आभार प्रदर्शन कॅडेट वैष्णवी घुगे, नेहा ठुकरे यांनी केले आहे.

# Constitution day Celebration 26th Nov 2022

दैनिक
**भारत संग्राम**
28 Nov 2022

## श्री शिवाजी महाविद्यालयात चिखली येथे संविधान दिन साजरा



सुनिल अंभोरे/चिखली तालुका प्रतिनिधी - दिनांक २६/११/२०२२ चिखली येथील स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात सकाळी संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले होते.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख यांचे मार्गदर्शनात राज्यशास्त्र विभाग तसेच राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) यांचे संयुक्त विद्यमाने संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी महाविद्यालयाच्या मैदानावर दररोज हजेरी लावणारे गुड मॉर्निंग मंडळाचे सर्व सदस्य तथा चिखली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल भाऊ बोंद्रे,डॉ.सत्येंद्र भुसारी डॉक्टर असोशियनचे सर्व डॉक्टर्स, प्रतिष्ठित नागरिक महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच राहुल भाऊ बोंद्रे यांनी संविधान दिनाचे निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले.

संविधान दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये संविधाना विषयी जाणीव व जागृती निर्माण व्हावी म्हणून शंभर गुणांच्या बहुपर्यायी परीक्षेचे आयोजन राज्यशास्त्र विभाग राष्ट्रीय छात्र सेना,राष्ट्रीय सेवा योजना यांचे वतीने करण्यात आले आहे.या परीक्षेत प्रथम क्रमांक १००० रुपये ,द्वितीय कार्यक्रमास ७००रुपये,तर तृतीय क्रमांकास ५०० रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे,असे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. जे.जे.जाधव यांनी घोषित केले.कार्यक्रमाचे शेवटी संविधाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

तसेच २६/११ च्या मुंबई वरील हल्ल्यात हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डी आर उन्हाळे यांनी तर आभारप्रदर्शन एन.सी.सी चे प्रमुख कॅप्टन प्रा किरण पडघान यांनी व्यक्त केले.

# Punit Sagar Sankalp on 2nd Dec,2022

दैनिक
**किसान सभा**
शनिवार ३ डिसेंबर २०२२ ४

## श्री.शिवाजीच्या एनसीसी युनिटद्वारे पैनगंगा नदीचे पात्र स्वच्छता अभियान




**चिखली/प्रतिनीधी :** स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयातील एनसीसी युनिट द्वारे दिनांक २ डिसेंबर २०२२ रोजी १३ महाराष्ट्र बटालियन खामगांव येथिल कमांडीग ऑफिसर कर्नल अमित भटनागर व रिसनलदार मेजर धर्मेंद्रसिंह,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली पुनीत सागर हे अभियान राबविण्यात आले.या अभियानांतर्गत आपल्या गावातील नदीची स्वच्छता करण्यात यावी असा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाद्वारे आम्ही आपल्या चिखली शेजारील पैनगंगा नदीच्या पात्राची स्वच्छता केलेली आहे.सर्व एनसीसी कॅडेटनी त्या ठिकाणी जाऊन त्या पात्राच्या बाजूला असलेला काडीकचरा,कॅरीबॅग, रिकाम्या पाणीबॉटल हे सर्व उचलून ते एका ठिकाणी जमा करून त्याला पेटवून देण्यात आलं व त्याची विल्हेवाट लावण्यात आली यासाठी जवळपास ११० केल्याने यामध्ये सहभाग नोंदवलेला होता.यासाठी एनसीसी अधिकारी लेफ्ट.किरण पडघान,सिनिअर अंडर ऑफिसर गोविंद सुरडकर, ज्युनिअर अंडर ऑफिसर निकिता डुकरे व कैलास भांबळे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

किसान सभा

# Agniveer Felicitation programme 23rd Dec 2022



## श्री.शिवाजी महाविद्यालय एनसीसी युनिटचे अग्नीविरमध्ये निवड झालेल्या 11 कॅडेटचा गुणगौरव

चिखली: स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात शुक्रवार 23 डिसेंबर रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल अमित भटनागर रिसालदार मेजर धर्मेंद्रसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी युनिटचे प्रमुख लेफ्टनंट किरण पडघान यांनी श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 124 व्या जयंती उत्साहानिमित्त औरंगाबाद येथे पार पडलेल्या अग्नीवीर भरती प्रक्रियेमध्ये महाविद्यालयातील एनसीसीचे 11 कॅडेट यांची निवड झाली.

**साम. अखंड ग्रुप**
**प्रतिनिधी**
**खास - बातमी**

[illegible]

# Cleanliness Drive 24th Dec,2022

## श्री शिवाजी महाविद्यालयात एनसीसी व एनएसएस युनिट द्वारे स्वच्छता अभियान उत्साहात पूर्ण




दिव्य मातृछाया
मयूर मोरे

चिखली स्थानिक श्री. शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली येथील एनसीसी युनिट द्वारे दि.24 डिसेंबर 2022 रोजी श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पंजाबराव उपाख्य कै.भाऊसाहेब देशमुख यांच्या 124 व्या जयंती उत्सवानिमित्त स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आलेले होते.

या अभियानामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख महाविद्यालयाच्या आयक्यूएसी डॉ. वनिता पोच्छी 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कर्नल अमित भटनागर व रिसालदार मेजर महेंद्रसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले. एनसीसीचे सर्व कॅडेट व राष्ट्रीय स्वयंसेवक व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी बंधू व भगिनी यांनी महाविद्यालयाची महाविद्यालयाचे गेट ते समाधी स्थळ इथपर्यंत महाविद्यालयातील सर्व जसे सायकल स्टॅन्ड,मैदान व इतर सर्व ठिकाणची स्वच्छता करण्यात आली या ठिकाणच्या सर्व कॅरीबॅग झाडे झुडपे यांचे व्यवस्थित विल्हेवाट लावण्यात आली.

त्यानंतर महाविद्यालयासमोरील गार्डनची सुद्धा स्वच्छता करण्यात आली यासाठी महाविद्यालयातील सर्व कर्मचारी बंधू-भगिनी व सर्व राष्ट्रीय छात्र सैनिक राष्ट्रीय स्वयंसेवक, व महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# Blood Donation Camp 12th Jan 2023

दैनिक किसान सभा
शुक्रवार १३ जानेवारी २०२३ ४

## श्री.शिवाजी महाविद्यालयात एनएसएस व एनसीसी युनिटद्वारे रक्तदान शिबिराचे आयोजन

**चिखली/प्रतिनीधी :** स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली येथे दिनांक १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवानिमित्त व स्वामी विवेकानंद यांच्या जन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य विष्णूभाऊ पाटील तसेच मधुकरराव पाटील, प्राचार्य डॉ. पी.एस.वायाळ हे कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



या शिबिराचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख हे होते.आयक्यूएसी समन्वयक डॉ.वनिता पोच्छि प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ.मीना निकम,डॉ.राजू गवई डॉ.धनराज बोबडे तसेच या सर्व रक्तदान शिबिरासाठी बुलढाणा जिल्हा शल्यचिकित्सक आरोग्य विभाग येथील डॉ.किशोर गवई.वैद्यकीय अधिकारी गौरव कुलकर्णी तंत्रज्ञ, भुषण खरे तंत्रज्ञ, कु.पुजा बनकर तंत्रज्ञ, कॅम्बेल मॅडम, ज्ञानेश्वर गाडेकर समुपदेशक अनिल घोडेस्वार कक्षसेवक,पंकज चंदर, कक्षसेवक, श्री.वाकोडे वाहनचालक या सर्वांचे सहकार्य लाभले.या रक्तदान शिबिरात एकूण ३३ रक्तदात्यांनी रक्तदान केले.या रक्तदात्यांमध्ये डॉ.जे.जे.जाधव, प्रा. पाटील, प्रा.तृप्ती श्रीरामे ,प्रा.गायके, प्रा.सचिन कोकाटे, प्रा.संजय साळवे एनएसएस कार्यक्रमाधिकारी स्वप्निल काळे, विशाल इंगळे, शिवदास उगले, ऋषिकेश पेम्पाळे, उदय वाघ, प्रवीण बोर्डे, करण पेंढारकर, एनएसएस व एनसीसीच्या रक्तदात्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजयश्री हेमके व आभारप्रदर्शन लेफ्ट.किरण पडघान यांनी केले. या शिबिराच्या यशस्वीपणे राबविण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थि,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू भगिनी बुलढाणा जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील व चिखली ग्रामीण रुग्णालयातील बंधू भगिनी यांनी परिश्रम घेतले.

# Army Day Celebration 16th Jan2023

आमच्या सोबत...आता दररोज रहा अपडेट !
परतवाडा टाईम्स
SOCIAL MEDIA EDITION
संपादक:-नरेश तायवाडे
paratwadatimes
दि. 17-01-2023

## श्री शिवाजी महाविद्यालयात एनसीसी युनिट द्वारे आर्मी डे उत्साहात साजरा

चिखली । मयूर मोरे

स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली येथे दि.१६ जानेवारी 2023 रोजी 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल अजित भटनागर लिमालदार मेजर धर्मेंद्रसिंह तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ओमराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आर्मी डे उत्साहात साजरा करण्यात आला.या सशस्त्र सेनादिनानिमित्त 13 महाराष्ट्र बटालियनचे हवालदार खनका हवालदार भान्ना हे उपस्थित होते.या सशस्त्र सेना दिन दिनानिमित्त महाविद्यालयातील सर्व कॅडेटला सशस्त्र दिनाचे महत्त्व,सशस्त्र दिनाची स्थापना याबद्दल माहिती देण्यात आली.तसेच पॉईंट टू टू रायफल याबद्दल ओळख करून देण्यात आली.



व त्याची हाताळणी सुद्धा करून देण्यात आली.त्यासाठी 13 महाराष्ट्र बटालियन येथील कमांडिंग ऑफिसर अजित भटनागर यांनी ते हत्यार महाविद्यालयाला उपलब्ध करून दिलेले होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनसीसी अधिकारी लेफ्टनंट किरण पडघान यांनी केले. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंडर ऑफिसर निकिता झुकरे व आभार प्रदर्शन सीनियर अंडर ऑफिसर गोविंद सुरडकर यांनी केले.या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व एनसीसी कॅडेट शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# Kranti Din 23rdJan2023


आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

परतवाडा टाईम्स

SOCIAL MEDIA EDITION

संपादक:-नरेश तायवाडे

देशमुख प्लॉट, पेन्शनपुरा परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती-444805 | paratwadatimes@gmail.com | paratwadatimes | YouTube paratwadatimes

दि. 24-01-2023


## श्री .शिवाजी महाविद्यालयात एनसीसी युनिटद्वारे क्रांतीदिन उत्साहात साजरा



**चिखली । मयूर मोरे**

स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली येथे दिनांक 23 जानेवारी रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख तसेच 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर कर्नल अमित भटनागर यांच्या मार्गदर्शनाखाली नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती क्रांती दिन म्हणून साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील हवालदार विमल राणा प्रमुख वक्ते कमलेश थापा हे होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लेफ्टनंट किरण पडघान यांनी केले. तसेच हवालदार विमलेश राणा यांनी कॅडेटला नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना जपान सोबत केलेला रेडिओ संवर्धन स्थापना याबद्दल माहिती दिली.प्रमुख वक्ते कमलेश थापा यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला.नेताजी सुभाष चंद्र बोस यांचा जन्म 23 जानेवारी 1897 ला कटक कलकत्ता या ठिकाणी झाला.त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ व त्यांच्या आईचे नाव प्रतिभावती बोस हे होते.त्यांचे वडील वकिली पेशा करायचे,त्यांच्या मुलीचे नाव अनिताबोस होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्युनिअर अंडर ऑफिसर निकिता डुकरे तसेच आभार प्रदर्शन सीनियर अंडर ऑफिसर गोविंद सुरडकर यांनी केले या कार्यक्रमासाठी सर्व एनसीसी कॅडेट यांनी परिश्रम घेतले.

# National Girls Day 24thJan2023


आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

परतवाडा टाईम्स

SOCIAL MEDIA EDITION

संपादक:-नरेश तायवाडे

देशमुख प्लॉट, पेन्शनपुरा परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती-444805 | paratwadatimes@gmail.com | paratwadatimes | YouTube paratwadatimes

दि. 25-01-2023


## श्री .शिवाजी महाविद्यालयात एनसीसी युनिटद्वारे राष्ट्रीय बालिका दिन उत्साहात साजरा

**चिखली । मयूर मोरे**

स्थानिक श्री.शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली येथे दिनांक 24 जानेवारी 2023 रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख व 13 महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव येथील कमांडिंग ऑफिसर अमित भटनागर रिसालदार मेजर धर्मेंद्र सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी अधिकारी लेफ्टनंट किरण पडघान यांनी राष्ट्रीय बालिका दिनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख हे होते प्रमुख वक्त्या म्हणून प्राध्यापिका प्रतिभा चिखले व प्रियांका चव्हाण ह्या होत्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लेफ्टनंट किरण पडघान यांनी केले.त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये सांगितले की सरकारने 2008 सालि 24 जानेवारी राष्ट्रीय बालिका दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली होती.इंदिरा गांधी यांनी या दिवशी पहिल्यांदाच पंतप्रधान पदाच्या खुर्चीवर बसल्या होत्या,त्यामुळे हा दिवस राष्ट्रीय बालिका दिन म्हणून साजरा करण्यात येतो.तसेच या



दिवसाचे दुसरे महत्त्व म्हणजे 24 जानेवारी 1950 रोजी आपण आपल्या भारताचे राष्ट्रगान याचा स्वीकार केलेला होता.त्या राष्ट्रगीताची रचना नोबेल पारितोषिक विजेते रवींद्रनाथ टागोर यांनी केलेली होती.प्रतिभा चिखले यांनी आपल्या भाषणामध्ये आपण मुलींच्या शिक्षणाकडे जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे.त्याचबरोबर मुलींच्या जन्माचे प्रमाण सुद्धा वाढविले पाहिजे. प्रियंका चव्हाण यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की आपण मुलींना जन्मदर वाढवून मुलींना सुद्धा सन्मानाची वागणूक देत घरांमध्ये समानतेचे भावना जोपासली पाहिजे.अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख यांनी मुलींसाठी सरकारद्वारे राबविल्या जाणाऱ्या विविध स्कॉलरशिप तसेच मोफत पास योजना बालवाडीपासून मोफत शिक्षण बारावीनंतर विद्यापीठाद्वारे दिल्या जाणारी औरंगाबाद करिता ८० हजार रुपयाची स्कॉलरशिप अशा विविध स्कॉलरशिप बद्दल व त्यांचा फायदा मुलींनी कसा घ्यावा याबद्दल माहिती दिली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिनिअर अंडर ऑफिसर निकिता डुकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन गोविंद सुरडकर यांनी केले.या कार्यक्रमासाठी प्रा.सतीश काळे प्रा.अनिल मोरल प्रा.दीपक माळके उपस्थित होते या कार्यक्रमासाठी सर्व एनसीसी कॅडेट व सर्व महाविद्यालयातील मुलींनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

# Annual prize distribution ceremony 26th Jan 2023


तरुण भारत

Akola Main | 2023-01-29 | Page-7

epaper.tarunbharat.net


## श्री शिवाजी महाविद्यालयात बक्षीस वितरण

◆ चिखली, २८ जानेवारी

स्थानिक श्री शिवाजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त वार्षिक बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. पी. एस. वायाळ तर प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख, अ‍ॅड. बाबासाहेब भोंडे, मधुकरराव पाटील, विष्णू पाटील पडघान, प्रा. पु. पु. खरात, पत्रकार पवन लढ्ढा, डॉ. आर. पी. गवई, डॉ. वनिता पोचे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जन्मदिना निमित्त आयोजित विविध स्पर्धांमधील विजेते विद्यार्थी तसेच एन. सी. सी., एन. एस. एस., युवा सांस्कृतिक महोत्सव, क्रीडा स्पर्धा, विविध वादविवाद, वक्तृत्व आविष्कार स्पर्धा विद्यापिठाच्या परीक्षेतील मेरीट विद्यार्थी यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र तसेच साहित्य देऊन सन्मानित करण्यात आले.



कार्यक्रमात बोलताना मान्यवर

संशोधन क्षेत्रात पीएच. डी. प्राप्त प्राध्यापक, नेट सेट उत्तीर्ण विद्यार्थी, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकीय सेवेत निवड झालेले विद्यार्थी यांनाही या प्रसंगी सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. पी. एस. वायाळ यांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार काळाची गरज लक्षात घेऊन शैक्षणिक पदवी बरोबरच नोकरी व्यवसाय विषयक कौशल्य आत्मसात करावे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बक्षीस वितरण समितीचे प्रमुख प्रा. नरेन्द्र ठाकरे, प्रा. एस. एन. मेढे, प्रा. संजय साळवे, डॉ. ए. बी. कदम, प्रा. पी. पी. बनसोडे, प्रा. आर. के. पवार, प्रा. जाधव, राजेंद्र करपे, जगदीश वारे, आर. ए. शेख यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. सुनिता कलाने, प्रा. प्रतिभा चिखले, प्रा. डी. आर. उन्हाळे, प्रा. सचिन कोकोडे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. जे. जे. जाधव यांनी केले. ◄(तभा वृत्तसेवा)

# Punit Sagar River cleaning campaign 3rd Feb 2023


आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

परतवाडा टाईम्स

SOCIAL MEDIA EDITION

संपादक:-नरेश तायवाडे

दि. 03-02-2023


## श्री .शिवाजी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटद्वारे

### पुनीत सागर अभियाना अंतर्गत पैनगंगा नदीचे पात्र स्वच्छता अभियान राबविण्यात आले

चिखली । मयूर मोरे

स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयातील एनसीसी युनिट द्वारे दिनांक 3फेब्रुवारी 2023 रोजी 13 महाराष्ट्र बटालियन खामगाव येथिल कमांडींग ऑफिसर कर्नल अमित भटनागर व रिसालदार मेजर धर्मेंद्रसिंह,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली पुनीत सागर हे अभियान राबविण्यात आले.या अभियानांतर्गत आपल्या गावातील नदीची स्वच्छता करण्यात यावी असा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाद्वारे आम्ही आपल्या चिखली शहराशेजारील पैनगंगा नदीच्या पात्राची स्वच्छता केलेली आहे.सर्व एनसीसी कॅडेटनी त्या ठिकाणी जाऊन त्या पात्राच्या बाजूला असलेला काडीकचरा, कॅरीबॅग, रिकाम्या पाणीबॉटल हे सर्व उचलून ते एका ठिकाणी जमा करून त्याला पेटवून देण्यात आलं व त्याची विल्हेवाट लावण्यात आली यासाठी जवळपास 112 कॅडेटने यामध्ये सहभाग नोंदवलेला होता.

यासाठी एनसीसी अधिकारी लेफ्ट. किरण पडघान, प्रा.डी.आर.उन्हाळे, प्रा. दिपकमानाळे, ज्युनिअर अंडर ऑफिसर निकिता ठुकरे व शंतनू कल्याणकर, नेहा बेडे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

